PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 7, ISSUE 4

# ग्रामीण विकास व महात्मा गांधी

**प्रा. डॉ. कैलास भरकड**
सहायक प्राध्यापक
इतिहास विभाग
विवेकानंद कला सरदार दलिपसिंग वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय औरंगाबाद.
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना

प्राचीन कालखंडापासून भारत हा एक कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जातो. प्राचीन कालखंडामध्ये भारताचा व्यापार तसेच कृषिजन्य पिके यांचा व्यापार प्राचीन व मध्ययुगीन युरोप सोबत भरभराटीचा आलेला होता याची अनेक दाखले इंडिका, पेरीप्लस, एरीथ्रियन सी, प्लीनी इ. ग्रंथ तसेच लेखकांच्या प्रवासवर्णनांवरून स्पष्टपणे दिसून येते. आधुनिक भारतावर जवळपास 150 वर्ष ब्रिटिशांनी भारतावर राज्य केले. स्वातंत्र्याची चळवळ शहरी व ग्रामीण भागामध्ये दूरपर्यंत पोहोचविण्यामध्ये महात्मा गांधी यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. सन 1915 साली 9 जानेवारी रोजी महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेहून भारतात आल्यानंतर नामदार गोपाल कृष्ण गोखले यांच्या आदेशावरून गांधीजींनी सुमारे एक वर्ष भारत भ्रमण केले. यावेळी महात्मा गांधीजींनी भारताचा ग्रामीण भाग अतिशय जवळून पाहिला व अनुभवल. आधुनिक भारताच्या सुधारणेबाबत गांधीजींनी व्यक्त केलेले आर्थिक विकासाबाबत, सामाजिक विकासाबाबत, ग्रामीण विकासाबाबतचे विचार तसेच सत्याग्रह, अहिंसा, सर्वोदय, स्वदेशी, बहिष्कार, आणि खेड्याकडे चला याबाबतचे सतविचार हे उद्याच्या नव्या पिढीला दिशादर्शक ठरू शकतात. गरज इतकीच की या महासत्तेच्या वाटेवरून जाताना आणि तत्कालीन राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांचे स्वप्न साकार करण्यासाठी शहरांच्या विकासाबरोबरच ग्रामीण विकासाकडे (खेड्याच्या विकासाकडे) लक्ष देण्याचे कारण भारत शहरात नसून खेड्यातच आहे.

गांधीजींच्या महात्म्यात असे काय होते वा आहे की, ज्यांची समोहिनी आईन्स्टाईन पासून रिचर्ड अँटेनबटोपर्यंत, रवींद्रनाथ टागोरापासून विनोबा भावेपर्यंत, मार्टिन ल्युथर किंगपासून नेल्सन मंडेलापर्यंत सर्वांना पडावी सर्वांचा आदर्श महात्मा गांधी का? काही वर्षांपूर्वी जगप्रसिद्ध तत्त्वज्ञ सॅम पित्रोदा यांनी त्यांच्या 21व्या शतकात भारत नेण्याच्या ॲक्शन इंडिया चळवळीचा शुभारंभ गांधीजींच्या साबरमती आश्रमातून केला होता. वयाच्या साठीत असलेल्या पित्रोदांनाही गांधीजींचे आकर्षण का? गांधी तत्त्वज्ञान हा भल्या-भल्यांच्या चिंतन मननाचा विषय आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून बरीच वर्षे लोटली असताना आपली लोकशाही परिपक्व झाल्याचे आपण मानतो. जगभरातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून सारे जग आपल्याकडे बघत आहे. परंतु देशात सध्य: स्थितीत ज्या घटना घडत आहेत त्यावरून महात्मा गांधी यांनाअभिप्रेत असलेली लोकशाही व्यवस्था ती हीच काय असा संभ्रम निर्माण झाल्याशिवाय राहत नाही स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय, धर्मनिरपेक्षता या बाबींना राज्यघटनेत दिलेले महत्त्व बघता सर्व सामान्य नागरिक व देश चालवणारे नेते याबाबतचा खरंच प्रामाणिकपणे अवलंब करतात का? हा प्रश्न संशोधक आणि विचारवंतांना पडत असल्याचा पदोपदी जाणवत आहे. अर्थात गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा लोक तर होत नाही ना? हा प्रश्न मला भेडसावत आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून अनेक सकारात्मक आणिनकारात्मक बदल भारतीयांनी बघितले आहे. सततची वाढणारी गुन्हेगारी, झपाट्याने होणारे शहरीकरण, लोकसंख्येची भयानक वाढ, जागतिक बाजारपेठ आणि त्यातील जीवघेणी स्पर्धा, ग्रामीण भारत व आधुनिक पुढारलेला भारत व त्यात सततची रूंदावणारी दरी पराकोटीची श्रीमंती, अत्यंतिक दारिद्र्य, सामाजीकरण अर्थकारणात झालेला विस्मयकार बदल, भ्रष्टाचार, दहशतवाद, धार्मिक व जातीय ताणतणाव या सर्व बाबींचा सोयीनुसार लावलेला अर्थ इत्यादी बाबी आधुनिक भारतात विचारी माणसांना त्रस्त करून सोडतात. ही आव्हाने सध्य:स्थितीत लोकशाही व्यवस्थेत आढळून येतात. या सर्वांवर वेळीच अंकुश ठेवायचा असेल तर खऱ्या अर्थाने गांधीजींच्या तत्त्वज्ञानाची आवश्यकता आहे. तरच महात्मा गांधीजींना अपेक्षित असलेली खरी लोकशाही व्यवस्था स्थापन होईल.

खरंतर ग्रामीण विकासाबाबतची मुहूर्तवेढ ही महात्मा गांधीजींनी रोवली होती असे म्हणावे लागेल शिवाय ग्रामीण विकासाचे आद्य प्रवर्तक शिल्पकार म्हणूनही त्यांनाच संबोधले

जाते. त्यांच्या विचारांचा वैचारिक वारसा असल्यामुळेच ही ग्रामविकासाबाबतचे विचार टिकून आहे. गांधीजींची अशी भावना होती की, खेडी हीच खऱ्या अर्थाने विकासाची गुरुकिल्ली आहे. खेड्याच्या विकासाशिवाय भारताचा विकास अशक्य आहे व या दृष्टीनेच त्यांनी ग्रामविकासाची संकल्पना मांडली. समर्थ भारत उभा करायचा असेल तर खेड्यांचा विकास झालाच पाहिजे ग्रामीण भागातील समस्या संपल्याशिवाय भारत बलवान होऊ शकत नाही अशी गांधीजींची धारणा होती, म्हणूनच त्यांनी आपल्या हजारो अनुयायांना खेड्याकडे चला हा संदेश दिला होता. भारतीय ग्रामव्यवस्था बळकट झाली तरच खऱ्या अर्थाने सक्षम आणि बलवान भारत निर्माण होईल.महात्मा गांधीजींनी संशोधनाच्या पातळीवर जणू याची दखलच घेतली होती त्यांचे हे ग्रामीण विकासाचे दृष्टेपण व एकूणच विचारांचे सामर्थ्य पाहून आईन्स्टाईन, मार्टिन ल्युथरकिंग, रवींद्रनाथ टागोर, नेल्सन मंडेला या सर्व महापुरुषांनी खरं तर गांधीजींना आदर्श स्थानीच मानले. एव्हाना बराक ओबामा यांनी तर गांधीजींना आधुनिक जगाचे रोले मॉडेल म्हणून संबोधले आहे.

प्राचीन काळातील खेड्यांचे विवेचन करताना महात्मा गांधींनी असे म्हटले की, मी या देशातील मूळच्या संस्था जेव्हा बघतो तेव्हा ग्राम पंचायती माझे लक्ष वेधून घेतात. हिंदुस्तान खरोखर प्रजासत्ताक देश आहे म्हणूनच आज पर्यंत त्याच्यावर झालेल्या आघातांना सामोरे जाण्याचा समर्थ ठरला आहे. सत्ताधारी यांचा संबंध आला तो फक्त महसूल गोळा करण्यापुरताच लोकराज्याचे देणे राजाला देऊन टाकले की बाकीच्या बाबतीत स्वतःच्या इच्छेप्रमाणे बरेचसे कार्य करीत आलेले आहेत असे दिसून येते. मोठ्या प्रमाणावरील वर्ण संघटनेमुळे समाजाच्या केवळ धार्मिक गरजापूर्वीला जात असत असे नव्हे तर त्यांच्या राजकीय गरजा सुद्धा पूर्वील्या जात असत. खेड्यातील लोकवर्णव्यवस्थेच्या आधारे आपल्या अंतर्गत कारभार सांभाळीत असत आणि वर्णव्यवस्थेचे मार्फतच एका किंवा अनेक राजसत्ताकडून होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या जुलुमाला तोंड देत असत. जे राष्ट्र अशा प्रकारच्या वर्णपद्धतीतून आपली संघटनशक्ती उत्पन्न करण्यास समर्थ होऊ शकत होते त्या राष्ट्रात समाज व्यवस्था निर्माण करण्याचे सामर्थ्य नव्हते असे म्हणता येणार नाही. एकूणच या प्राचीन काळातील खेड्यांचा विचार केला तर सरजामशाही व वर्णद्वेषी समाज रचना.

यांच्या बंधनात ही ग्रामीण जनता गुंतली होती व म्हणूनच त्यांचा म्हणावा तितका ग्रामीण विकास घडवून आला नाही असे म्हणावे लागेल.

**ग्रामीण विकासाबाबत गांधीजींचे विचार:**

ग्रामीण विकासाबाबत गांधीजींचा दृष्टिकोन अभ्यासताना प्रामुख्याने व्यक्ती पेक्षा त्यांच्या वैचारिक विचारांचा अभ्यास करावा लागेल. गांधीजींच्या ग्रामविकासाच्या विचाराला ग्राम स्वराज्याचा विचार म्हणूनही ओळखले जाते. ग्रामस्वराज्यात खेड्यांची समस्यांतून मुक्तता करून ग्रामीण जीवनात नवचैतन्य निर्माण करावयाचे होते; तसेच ग्रामीण भागातील सामान्य माणसाचे हित झोपायचे होते. गावातील लोकांना गावाबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असावे, पंचायतीला गावातील तंटे मिळविणे व न्याय देणे याबाबत अधिकार असावेत, ग्रामपंचायती आर्थिक बाबतीत सक्षम असाव्यात त्यांना स्वतःचे उत्पन्न असावे. जीवन आवश्यक बाबतीत खेडी स्वावलंबी असावी, पिण्यासाठी स्वच्छ पाणी असावे, मुला मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था असावी अर्थात यासाठी गावातच प्राथमिक आणि माध्यमिक शाळा असावेत, गावात प्रौढ शिक्षणाची व्यवस्था करावी ज्यामुळे चांगले नागरिक निर्माण होऊ शकतात. तत्कालीन काळामध्ये गांधीजींनी वर्धा येथील शिक्षण संमेलनामध्ये बुनियादी शिक्षणाची आपली नवी संकल्पना देशासमोर मांडली होती. गांधीजींनी आपल्या अनुयायांना खेड्याकडे चला असा संदेश देत शहरीकरणाला व औद्योगीकरणाला विरोध केला. यामुळे आर्थिक विकेंद्रीकरण होऊन ग्रामीण जनता विकासापासून वंचित राहते. ग्रामीण विकासासाठी ग्रामस्थरावर लघु व कुटीर उद्योगांना चालना द्यावी ज्यामुळे स्थानिक पातळीवर आर्थिक स्त्रोत निर्माण होऊन खेडी स्वयंपूर्ण होण्यास मदत होते. अशी त्यांची धारणा होती. राम राज्याच्या कल्पनेतून त्यांनी विकेंद्रीत लोकशाही व्यवस्था बळकट होईल व खेडी स्वावलंबी होतील. स्वतःच्या देशाचा स्वाभिमान जागृत ठेवण्यासाठी, आपली अस्मिता टिकविण्यासाठी गांधीजींनी स्वदेशीचा स्वीकार आणि विदेशी चा बहिष्कार हा नारा देऊन स्वराज्य, ग्रामराज्य आणि आदर्श राज्य निर्माण करण्यासाठी आपले विचार मांडले.

अशा रीतीने महात्मा गांधीजींनी ग्रामीण विकासासाठी व ग्राम उद्योगासाठी आपल्या कार्यक्रमात खेड्यांना अन्न व कपडा या दोन बाबतीत आत्मनिर्भर करण्यावर भर दिला, तसेच ग्रामीण विकासासाठी विविध कार्यक्रम राबविले यात मुख्यतः खादी तयार करणे, खादीचा वापर

करण, ग्रामीण स्तरावरील उद्योगांचे पुनरुज्जीवन करणे, शेती व्यवसायात सुधारणा करणे, धानकुटाई, सुतकताई, तेल गाळणी, कपडे विणणे, लिंबाचे तेल तयार करणे, मेलेल्या पशूच्या कातड्यापासून जोडे तयार करणे शेतीस पूरक व्यवसायाबरोबरच गृह उद्योग व लघु- कुटीर उद्योग निर्माण करून रोजगाराच्या संधी गावातच उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला. याचाच एक भाग म्हणून त्यांनी 1936 साली अखिल भारतीय चरखा संघाची स्थापना केली व गावातून खादी केंद्रीय निर्माण केली, लक्षावधी लोकांना तिथे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या त्याचबरोबर अखिल भारतीय स्तरावर ग्राम उद्योग संघाची स्थापना करून उद्योगाला चालना दिली.

1) हिंदुस्तानी तालिका संघ.

2)खादी विद्यालय ( सेवाग्राम )

3) गांधी सेवा सदन

4) गांधी आश्रम

5) गांधी निकेतन

6) आदिम जाती सेवा संघ

7) अखिल भारतीय विणकर संघटना

8) अखिल भारतीय ग्रामीण उद्योग संघटना

9) गो सेवा केंद्र

या विविध संस्थांच्या माध्यमातून गांधीजींनी ग्रामीण विकासाचा संदेश खेड्यातील सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अवतरित कार्य केले.

**गांधीजींच्या ग्रामीण विकासाचे वैशिष्ट्ये:**

1) धर्मनिरपेक्षता

2) प्रौढांकरिता करमणूक केंद्र.

3) श्रेष्ठ व कनिष्ठ भेदभाव नाही.

4) गाव पातळीवर ग्रामसंरक्षक दल.

5) सहकार योजनेस चालना.

6) प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था.

7) खेड्यासाठी स्वच्छ पाणीपुरवठा.

**ग्रामीण शिक्षण:**

खेड्यातील सर्व मोठ्या वयांच्या सर्व माणसांना अक्षरज्ञान झाले तरच त्यांना शिक्षण घेता येईल ही भ्रामक समजूत सोडून दिली पाहिजे. ज्यांच्यात शक्ती आणि उत्साह असेल त्यांना अक्षरज्ञान देण्याचा प्रयत्न करणे इस्ट आहे. अशांना उत्तेजन दिले पाहिजे आणि त्यांच्या करिता पुरती सोय उपलब्ध करून दिली पाहिजे. परंतु पुष्कळ व्यक्तीला प्रौढ पणे लिहिणे वाचणे शिकण्यात आवडत नाही अशा माणसांना प्रौढ शाळेत येता येणारच नाही असं नसावं. खेड्यातील ग्रंथ भांडार मर्यादितच, अल्प असणार म्हणून अल्प प्रमाणात का होईना शिक्षण असल्याने स्वतःचे स्वतः ज्ञान वाढविण्याची काही प्रमाणात शक्ती येते. म्हणून गांधी म्हणतात की, जे सुशिक्षित आहेत अशांनी इतरांना शिकवावं. तसेच त्यांच्यासाठी व्याख्याने आयोजित करावी ग्रामीण लोकांनी काही प्रमाणात का होईना शैक्षणिक ज्ञान संपादन केले तर समाज शक्तीत वाढ होते.

**ट्रस्टशिप:**

संपत्तीच्या केंद्रीकरणामुळे होणारा अन्याय गांधीजींना टाळायचा होता पण त्याचबरोबर मालक आणि कामगार यामधील वर्ग युद्धाची जी कल्पना समाजामध्ये मांडलेली आहे त्यालाही त्याचा विरोध होता.त्यातूनच त्यांची विश्वस्त कल्पना उदयास आली. अहिंसा, सत्य, असंग्रह, ब्रह्मचार्य या गीतेत सांगितलेल्या तत्त्वातून विश्वस्त कल्पना उदयास आली. ज्या व्यक्तीकडे आपल्या गरजेपेक्षा अधिक मालमत्ता आली असेल त्या व्यक्तीने ती मालमत्ता स्वतःची संपत्ती न

मानता विश्वस्त मानावी. या संपत्तीचा उपयोग ग्रामीण भागातील दिन-दुबळ्या लोकांच्या कल्याणासाठी करावा.

**विकेंद्रीकरण:**

The Base of Gandhi And Swaraj is Decenterilizasion According to him Centrilization As a System is In consistent With non violent Structure of Society.

ग्रामीण रामराज्य संकल्पनेत राज्यांच्या अधिकारावर मर्यादा घालण्याचा विचार मध्यवर्ती आहे. त्यांच्या मते, ते राज्य आपल्या अधिकाराचा कमीत कमी वापर करते ते चांगले राज्य होय. त्यांनी राजकीय व आर्थिक विकेंद्रीकरणाचा पुरस्कार केला आहे. राष्ट्र उभारणीस स्वावलंबी खेडे हा महत्त्वपूर्ण घटक होय असे गांधीजींची मत होते. खेडे, ग्राम हा घटक महत्त्वाचा मानून खेडी जेव्हा स्वयंपूर्ण व स्वयंशासित होतात तेव्हाच खऱ्या अर्थाने ग्रामराज्य निर्माण होईल. अशा खेड्यातील लोक शांतीपूर्ण, सहकार्य पूर्ण व गौरवशाली जीवन व्यतीत करतील. प्रत्येक गावात एक पंचायत राहील. अहिंसात्मक गावाची कल्पना गावातच पूर्ण होऊ शकते.

Society based onnonviolence Can only a group setted In village in with voluntry co-Operation is the Condition of Dignified And peaceful Existence.

अशा खेड्यात राजकीय शक्तीचे केंद्रीकरण होणार नाही. त्यामुळे कुणीच कुणाच्या मार्गात अडथळा बनणार नाही. खेड्यांचा राज्यकारभार पाहण्यासाठी पंचायतीची सोय केली जाईल. यात पंचायतीकडे कायदेविषयक, न्यायविषयक आणि कार्यकारी सत्ता असेल. पंचायतीच्या माध्यमातून राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. गांधीजींच्या मते, खेडे हा घटक खऱ्या अर्थाने स्वयंपूर्ण होण्यासाठी या खेड्यातील प्रत्येकाने स्वतःवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. इतरांच्या विकासात अडचण निर्माण होणार नाही याबाबत जबाबदारीने स्व वर्तन ठेवले पाहिजे. ग्रामपंचायतीमार्फत तेथील लोकांचे प्रश्न सोडविले पाहिजेत. राजकीय शक्तीचे केंद्रीकरण गांधीजींना मान्य नव्हते, उलट सत्तेचे विभिन्न खेड्यात विकेंद्रीकरण झाल्यास खेडी स्वयत्त बनू शकतील. प्रत्येक खेडी सुखी बनेल तर देशातील मध्यवर्ती शासनाची गरज असणार नाही संपूर्ण समाज अहिंसामय व समतामय झाला की राज्याची दंडशक्ती अनावश्यक ठरेल.

**स्वदेशी आणि बहिष्कार:**

ब्रिटिशांचे धोरण भारतातील उद्योगधंद्याला मारक आहे. भारतासारख्या दारिद्र देशात उद्योगांची वाढ करावयाची असल्यास त्यांना संरक्षण दिले गेले पाहिजे. पण परकीय सरकार असे संरक्षण देणार नाही म्हणून भारतीयांनी स्वदेशीचे वृत्त स्वीकारले पाहिजे. आपण शक्यतो स्वदेशी वस्तू वापरू लागलो तर आपल्या देशातील उद्योगांना चालना मिळेल व त्यातून आपले दारिद्र्य कमी होईल व स्वाभाविकच ग्रामीण विकासाला चालना मिळेल अशी गांधीजींची धारणा होती.

**निष्कर्ष:**

1) गांधीजींच्या आदर्श राज्याचा आधार ग्राम किंवा खेडे हा आहे. देशाच्या उन्नतीसाठी त्यांनी खेडे हा घटक महत्त्वाचा मानला.

2) खेड्याचा विकास झाला तरच देशाचा विकास होईल हा गांधीजींचा विचार मार्गदर्शक ठरतो.

3) गांधीजींना भारतातील गरिबी, दारिद्र्य, बेकारी या समस्यांची जाणीव होती म्हणूनच त्यांनी स्वदेशीचा पुरस्कार केला व खादीस प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

4) भारत हा खेड्यांचा देश आहे. खेडी स्वावलंबी व्हावीत म्हणूनच गांधीजींनी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली.

5) स्वातंत्र्यानंतर देशाचा विकास कसा करायचा यासाठी आपण विविध देशांचा भांडवलवाद, समाजवाद यातून लोकशाही समाजवाद स्वीकारला पण ते सिद्धांत त्यांच्या देशाशी निगडित होते. रशियाकडून सात वार्षिक योजने ऐवजी पंचवार्षिक योजना घेतली.1956 पासून ही योजना राबविली जात आहे. ही योजना राबवून विविध क्षेत्रांवर खर्च केला परंतु देशाचा विकास वेगाने होऊ शकला नाही. कारण शहरीच विकसित झाली. गांधीजींचा विकासाचा मार्ग न अवलंबविल्यामुळे देशाचे प्रश्न तसेच राहिले. खेड्याकडे चला हा गांधीजींचा संदेश दुर्लक्षित

राहिला. त्यामुळे उशिरा का होईना खेड्यांचा विकास झाला तरच देशाचा विकास होतो. हा गांधीजींचा विचार मार्गदर्शक ठरतो.

6) गांधीजींच्या मते प्राचीन काळातील वर्णव्यवस्था ही सशक्त व सामर्थ्यशाली समाज रचनेचे मूळ असून या व्यवस्थेमुळे समाजाच्या सर्व गरजा पूर्ण होत असतात.

7) गांधीजींच्या मते, खरा हिंदुस्तान हा थोड्या शहरात नसून तो सात लाख खेड्यात बसलेला आहे. या खेड्यांनीच प्राचीन अद्भुत भारतीय संस्कृतीची जोपासना केलेली आहे तसेच प्राचीन काळापासून भारतातील खेड्यात अस्तित्वात असणाऱ्या ग्रामपंचायती भारत हा खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक असल्याची साक्ष देतात.

8) प्राचीन काळातील अर्थव्यवस्था आजच्या तुलनेत अधिक सशक्त होत. कारण स्वयंपूर्ण खेडी व दर्जेदार उत्पादन यामुळे संपत्तीचे ओघ पश्चिमेकडून पूर्वेकडे होत. ते आज उलट दिशेने प्रवास करताना दिसत आहे.

9) भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांमध्ये तीव्र वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेली बेरोजगारी, कृषी वरील वाढता ताण, प्रचंड दारिद्र्य, ग्रामीण व शहरी विकासातील वाढती तफावत यासारख्या अडचणीमुळे गांधीजींना अभिप्रेत ग्रामविकास अद्यापही साध्य झालेला नाही.

10) गांधीजींचा यंत्र युगाला विरोध होता. काही आवश्यक उद्योगांशिवाय यंत्र उद्योगाला त्यांनी विरोध केला. यंत्र हे राक्षसी आहे त्यामुळे मानवी संस्कृतीत कृत्रिमता येते. लोकांना रोजगार मिळणे आवश्यक आहे. यासाठी त्यांनी स्वतः चरखा चालवला. यंत्र युगामुळे देशांमध्ये बेकारी, दारिद्र्य इत्यादी प्रश्न निर्माण झाले आहेत. लोकांच्या जीवनात बदल झालेला दिसतो. देशाची खादी वापरणारे लोक अपवादाने पहावयाला मिळतात. त्यामुळे देशातील पैसा परदेशात जात आहे. येथील खादी उत्पादन करणारा कामगार उपाशी अवस्थेत जीवन जगतो.

11) गांधीजींच्या मते, खरा हिंदुस्थान हा थोड्या शहरात नसून तो सात लाख खेड्यात बसलेला आहे. या खेड्यांनीच प्राचीन अद्भुत भारतीय संस्कृतीची जोपासना केली आहे.

12) गांधीजींचा यंत्र युगाला विरोध होता कारण, यंत्र हे राक्षसी आहेत व त्यामुळे मानवी संस्कृतीत कृत्रिमता येते अशी त्यांची धारणा होती.

13) गांधीजींच्या तत्त्वज्ञानाची योग्य अंमलबजावणी झाल्यास आधुनिक भारताचा विकास होण्यास मदत होईल.

## संदर्भ ग्रंथ:

1) लोकराज्य: ऑक्टोबर 2012.

2) ब्रिजमोहन हेडा- महात्मा गांधींचे विचार-

नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद.

3) पंजाब चव्हाण, रामचंद्र भिसे, हनुमंत जवळगे- मूल्य व्यवस्था गांधी विचार, निर्मल प्रकाशन, नांदेड.

4) स्मरणिका- हिंद स्वराज्याची प्रसंगीतता- डॉ.एच. एन. सिंहा कला आणी वाणिज्य महाविद्यालय, पातुर, 30 जानेवारी 2010.

5) चोपडे किसन- भारतीय विचारवंत.

6) गांधी एम के, 1909, हिंद स्वराज्य.

7) औटी आनंत, 30 जानेवारी 2010, स्मरणिका, रिलेव्हन्स ऑफ हिंद स्वराज्य, पान न. 37.

8) शिंदे एम. आर, गांधीवाद विकासाचा मार्ग, स्मरणिका, पान. 40.

9) सुरळकर आर. जी, स्मरणिका, आधुनिक भारताच्या सुधारणेबाबत गांधींचे टीकात्मक परीक्षण.

10) Gandhi M.K, June 18.1942, Harijan.

11) गांधीजी, हरिजन-1963.

12) गांधीजी- यंग इंडिया.